# दुष्काळी कामे व जलसंधारण

दुष्काळ किंवा दुष्काळ सदृष्य परिस्थिती ही महाराष्ट्राला नवीन नाही. किंबहुना गेली १०-१२ वर्षे सोडली तर दुष्काळ हा आपल्या पांचवीलाच पुजलेला आहे. दरवर्षी कोठेना कोठे दुष्काळ असतोच. परंतु, त्यामुळे हताश होण्याचे कारण नाही. आपत्तीचा उपयोग संधी म्हणून करण्यातच खरा पुरुषार्थ. दुश्काळ आपल्याला पुढे उद्‌भवणाऱ्या मोठ्या संकटाची चाहूल असे समजावे. मोठ्या संकटाशी करण्याची रंगीत तालीमच आहे. दुष्काळाला कारणे अनेक. कांही आपल्या हातात तर बहुतेक आपल्या शक्ती बाहेर. तरी पण आपण दुष्काळाला समर्थपणे तोंड देवू शकतो व पुन्हा अशी परिस्थिती निर्माण झाली तर पूर्णपणे मात करू शकतो हा निश्चय सर्वानीच केला पाहिजे. सर्व काही राजा करेल ही वृत्ती सोडली पाहिजे. राजा खूप करेल आणि मी माझ्ा खारीचा वाटा उचलेन तेणे करून ह्या आपत्तीचा दुःपरिणाम कोणालाही फारसा जाणवणार नाही व पुऩ्हा अशी आपत्ती आलीच तर कोणालाही तिचा फटका बसणार नाही या दिशेने प्रयत्न करावयास पाहिजेत.

कांही डॉक्टर नुसते रोग्याकडे दृष्टाक्षेप टाकून रोगाचे अचूक निदान करतात. रामबाण औषधा देतात व रोग्याला पटकन बरे करतात. तर कांही रोग्याला पूर्णपणे तपासून पोटात दुखते म्हणून डोळ्यात घालण्यास अंजन देतात. दुसऱ्या प्रकारच्या डॉक्टराना कांही लोक विक्षिप्त खुशाल म्हणोत परंतु, हे दुसऱ्या प्रकारचे डॉक्टरच खरे जाणते असतात. रोगाच्या मुळावर अघात करणे हे जास्त महत्त्वाचे आहे. करपलेली भाकरी खाल्यामुळे पोटदुखी उदःभवली हे जाणून डोळ्याचा इलाज करण्यावर जास्त महत्त्व देतात. तेंव्हा तुष्काळाचे निदान करणे खूपच महत्त्वाचे आहे. मला खालील कारणे दिसतात. त्या मध्ये भरही घालता येईल. नव्हे घातलीच जाईल.

- पाऊस न पडणे व त्याची कारणे.
- पाऊस वेळेवर न पडणे व त्याची कारणे.
- कांही भागात अतिवृष्टी तर कांही भागात कोरडा ऋतु.
- पावसाचे पाणी ओहळ, नाले व शेवटी नदीतून वापरापूर्वी समुद्रात वाहुन जाणे.
- जे कोंही पाणी जमीनीत मुरते ते मुरते त्या पेक्षा जास्त प्रमाणात उपसणे.
- पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीकांचे व्यवस्थापन न करणे.
- पाण्याचा अपव्यय करणे.

या प्रत्येक कारणाच्या पोटी आणखी अनेक कारणे आहेत. त्या करता त्या त्या विषयातील तज्ञानी संशोधन केले पाहिजे. परंतु, तो पर्यंत थांबण्याची जरूरी नाही. जे सद्धा ज्ञात आहे त्याचा वापर करून उपाय सूरू केले पाहिजेत. वाहून जाणारे पाणी अडवून साठवणे हा उपाय ताबडतोब आचरणात आणता येईल. जेथे पाण्याचा थेंब पडतो तेथेच तो साठवता येईल. जमले तर जमीनीवर नाही तर जमीनीच्या पोटात. या पाण्याचा भलेही ताबडतोब उपयोग करता येणार नाही. वापर करण्याकरता आणखीही कांही कामे करावी लागतील परंतु त्याची वाट बघू नये. त्या करता पाणी अडवण्याचे किंवा गोळा करण्याचे काम थांबवू नये. डोंगराच्या पायथ्याला कित्येक ठिकाणे मिळतील जेथे मातीचे बंधारे बांधून पाणी अडवणे व साठवणे शक्य होईल. कांही ठिकाणे अशीही असतील जेथे मोठा बंधारा बांधून तलाव करू शकतो परंतु, डोंगरावर पडणारा पाऊस तो भरू शकत नाही. अशा ठिकाणी जवळपास नदी नाला असेल तर पुराचे पाणी उपसून असा तलाव भरता येईल. कित्येक ठिकाणी अनेक बंधारे कालव्याने जोडता येतील. डोंरावर जा,्त पाऊस पडत असेल परंतु, मोठा बंधारा शक्य नसेल तर तेथे जमीनीत पाणी मुरवता येईल. सह्याद्रीच्या पश्चिमेला पाणी साठवून बोगद्यातूव पूर्वेला आणता येईल. थोडक्यात पावसाच्या पाण्याचे सर्व थेंब जेथे पडेल तेथेच जमल्यास जमीनीवर नाहीतर जमीनीच्या पोटात साठवून ठेवण्याचे लक्ष ठरवून त्या दिशेने प्रयत्न करायचे. त्याचा ताबडतोब उपयोग किती होतो याला फारसे महत्त्व द्यायचे नाही.

ताबडतोब करण्याची दुसरी गोष्ट म्हणजे आहे ते पाणी कमीत कमी वापरणे. शेतीकरता, उद्योगाकरता व घरगुती वापराकरता. खूप पाणी लागणारी पिके कमीत कमी घ्यावीत, उद्योगात वापरलेले पाणी पुऩ्हा प्रक्रीया करून वापरावे, तसेच घरगुती वापरात काटकसर करावी. घरगुती वापरलेले पाणी शेती मध्ये वापरावे.

या करता पैसा पाहिजे. परंतु, हे सर्व एक दिवसात किंवा एक वर्षात करावयाचे नाही. जास्तीत जास्त दरवर्षी केले तरी २०, २५ काय ५०, १०० वर्षे करावे लागणार. पैशाच्या उपलब्धे प्रमाणात कित्येक वर्षे करत राहवे लागणार. तेंव्हा पैशाची काळजी करू नये. मिळेल त्या प्रमाणात काम करत राहणे. त्या मध्ये खंड पडू देऊ नये.